वरिष्ठ पोलीस ... वाशी पो. ठाणे

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नवी मुंबई **P.S.(ठाणे):** वाशी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0024 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/01/2023 08:57

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 17/01/2023

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 17/01/2023

**Time From (वेळेपासून):** 15:40 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 18/01/2023 **Time (वेळ):** 07:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 006

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/01/2023 08:06 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण, लि,वाशी उपविभाग,वाशी, नवी मुंबई

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाशी पो. ठाणे, नवी मुंबई

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): गणेश शिवाजी शिंदे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1972

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | बी-06, प्लट नंबर 29-सी,सेक्टर 4, वाशी, नवी मुंबई,वाशी,नवी मुंबई, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | बी-06, प्लट नंबर 29-सी,सेक्टर 4, वाशी, नवी मुंबई,वाशी,नवी मुंबई, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9594018148

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. रविंद्र केशवराव जाधव अतिरीक्त कार्यकारी अभियंता वर | | | 1. B/403,महावीर टावर, घणसोली,,से06 नवी मुंबई, रबाळे ,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

जबाब दि. 18/01/2023

मी गणेश शिवाजी शिंदे, वय-51वर्षे, व्यवसाय:- नोकरी, (मॅनेजर-मनाली इंटरप्रायझेस) राहणार:- बी-06, प्लॉट नंबर 29-सी, सेक्टर 4, वाशी, नवी मुंबई, मोबाईल नंबर - 9594018148 असा आहे.

मी वरील अर्जदार वर नमुद पत्त्यावर सन 2006 पासुन माझे परिवारासह राहणेस असुन, मी सन 1997 ते 2014 या कालावधीत बेस्ट मध्ये कंडक्टर म्हणुन नोकरीस होतो. त्यानंतर सन 2020 पासुन मी मनाली इंटरप्रायझेसचे प्रोपरायटर श्री.सतिश नारायण हिरे, रा.वाशी नवी मुंबई यांचेकडे मॅनेजर म्हणुन नोकरी करतो.

मनाली इंटरप्रायझेसमध्ये एम.एस.ई.डी.सी.एल. वाशी कार्यालयाचे हद्दीतील ग्राहकांचे लाईट मिटर रिडींग, बिल प्रिंटींग व बिल वितरणाचे कामकाज चालते. माझेकडे मनाली इंटरप्रायझेसचे वरील कामाव्यतिरिक्त, मनाली इंटरप्रायझेसचे एम.एस.ई.डी.सी.एल.कार्यालयास सादर केलेल्या बिलांचा पाठपुरावा करून ते मंजुर करून घेण्याचे काम आहे.

माहे डिसेंबर 2022 मध्ये मनाली इंटरप्रायझेस कंपनीने वाशी उप विभागात मिटर रिडींग, बिल प्रिंटींग व बिल वितरणाचे काम पुर्ण करून,केलेल्या कामाचे एकुण 7,21,905.71/- रूपयाचे बिल, दिनांक 12/01/2023 रोजी एम.एस.ई.डी.सी.एल.च्या ऑन लाईन पोर्टलवर दिसले(बिल जनरेट झाले). म्हणुन मी एम.एस.ई.डी.सी. एल. वाशी उपविभाग कार्यालयात गेलो आणि त्या ठिकाणी श्री.रविंद्र जाधव, अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांना भेटुन त्याना आमचे मनाली इंटरप्रायझेसचे एकुण 7,21,905.71/- रूपयाचे बिलावर शेरा मारून मंजुरीसाठी पुढे पाठविणेकरीता विनंती केली असता, श्री.रविंद्र जाधव यांनी मला, ''असेच कोणाचेही बिल पुढे जात नाही. त्याकरीता तुम्हाला काहीतरी करावे लागेल.'' असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना काय करावे लागेल ? असे विचारले असता, त्यावेळी त्यांनी माझेकडे सदरचे बिलावर ''समाधानकारक'' शेरा मारून मंजुरीसाठी पुढे पाठविणेसाठी 20,000/- रू.लाचेची मागणी करून, मनाली इंटरप्रायझेसचे बिल पुढे पाठवायचे असेल तर तुम्हाला मला 20,000/- रू. दयावेच लागतील नाहीतर तुमचे बिल मंजुरीसाठी पुढे जाणार नाही. असे बोलुन माझेकडे 20,000/- रू.लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना माझेकडे एवढे पैसे नसल्याचे सांगितले. परंतु, त्यांनी माझे काही एक ऐकले नाही व बिलावर ''समाधानकारक'' शेरा मारून मंजुरीसाठी पुढे पाठवायचे असेल, तर तुला मला 20,000/- रू.दयावेच लागतील नाहीतर तुझे काम होणार नाही, असे बोलुन लवकरात लवकर पैशांची व्यवस्था करून, पुढील आठवडयात एम.एस.ई.डी.सी.एल. वाशी उपविभाग कार्यालयात भेटण्यास येण्यास सांगितले. त्यावेळी मी त्यांना, मी तर मनाली इंटरप्रायझेसचा एक कर्मचारी असल्याचे सांगुन, मी तुमचे म्हणणे माझे मालकापर्यत पोहचवतो असे सांगुन मी तेथुन निघुन आलो व घडलेला सर्व प्रकार मनाली इंटरप्रायझेसचे प्रोपरायटर श्री.सतिश नारायण हिरे यांना सांगितला. त्यावर श्री.सतिश नारायण हिरे यांनी श्री.रविंद्र जाधव, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, उपविभाग, वाशी यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने श्री.रविंद्र जाधव, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, उपविभाग, वाशी यांचेविरूध्द कारवाई करणेकामी अॅन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय, ठाणे येथे तक्रार देण्यास मला सांगितले.

तदनंतर दिनांक 13/01/2023 रोजी मी मनाली इंटरप्रायझेसचे कार्यालयातुन, मनाली इंटरप्रायझेसचे एकुण 7,21,905.71/- रूपयाचे बिल एम.एस.ई.डी.सी.एल.च्या ऑन लाईन पोर्टलवर अपलोड केलेले आहे.

मी दिनांक 17/01/2023 रोजी पुन्हा एम.एस.ई.डी.सी.एल.उपविभाग, वाशी कार्यालयात आमचे मनाली इंटरप्रायझेसचे बिलासंदर्भात चौकशी करण्याकरीता श्री.रविंद्र जाधव, अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांचेकडे जाणार आहे. परंतु मला म्हणून श्री. रविंद्र जाधव, अतिरीक्त कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कं.लि., वाशी उपविभाग, वाशी, नवी मुंबई यांना लाच देण्याची इच्छा नाही म्हणून त्यांचे विरूध्द अॅन्टी करप्शन ब्युरो विभागामार्फत कायदेशीर कारवाई होणे करीता दिनांक 16/01/2023 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे हजर राहून तक्रार दिली आहे.



Scanned with OKEN Scanner

तदनंतर मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 17/01/2023 रोजी सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करुन, डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच साक्षीदार श्री. राजेश गोटीराम कोळेकर, लिपिक, वर्तकनगर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचे सह माझे अॅक्टीव्हा टु व्हीलर मोटर सायकल क्रमांक एम.एच.43 ए एस 3925 या वाहनाने लोकसेवक श्री. रविंद्र जाधव, अतिरीक्त कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.लि., वाशी यांचे कार्यालयामध्ये जावून त्यांना त्यांचे केबीनमध्ये समक्ष भेटलो आणि ''आमच्या मनालीच्या बिलाच'' असे विचारले असता, त्यांनी मला प्रथम '' तुम्ही तर काही भेटत बी नाही.दोन वर्षापासून मी आल्या आल्यापासून लागत नाही.तुमचा काही पत्ताच नाही. मी आल्यावर. अस कुठ असतका'' असे विचारले. त्यावर मी त्यांना वेळ नसतो असे सांगितले. तेव्हा लोकसेवक श्री. जाधव यांनी ''मला तुमच्या बिलींगसाठी किती मेहनत घेतो माहित आहे तुम्हाला.सर्व गोष्टी मी करतो इथे बसून तुमच्याकरता.एवढं कुणीच करत नाही विचारा तुम्ही त्यांना. लोकांना विचारा. हिरे ला विचारा.'' असे सांगितले. त्यावर मी त्यांना ''बिलांच कसं काय करायचं. बिलं टाकली त्या दिवशी'' त्यावर लोकसेवक श्री.जाधव यांनी मला ''जी प्रोसेस आहे ती करून घ्या ना. मी बघतो ना संपला विषय'' असे सांगितले. त्यावर मी त्यांना प्रोसेस केली असे सांगितले. त्यावर त्यांनी मला ''पाहतो मी चेक करतो'' असे सांगितले. त्यावर मी लोकसेवक श्री. जाधव यांना '' मला सतिश हिरे यांनी भेटण्यास सांगितले आहे'' असे सांगितले असता,लोकसेवक श्री. जाधव यांनी मला ''तुम्ही भेटले ना मग मला. आता कसं भेटायचं, काय भेटायचं,ते पहा तुम्ही तुमचं. ठीक आहे'' असे सांगून जाण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच श्री. कोळेकर तेथून सरकारी वाहन थांबलेल्या ठिकाणी परत आलो.

तद्नंतर सदरची हकीगत पोनि. श्रीमती ढगे पाटील यांना सांगितली असता, श्रीमती ढगे पाटील यांनी पंचांशी चर्चा विनिमय करून, लाचेची मागणी स्पष्ट न झाल्याने, मला पुन्हा पंच श्री. कोळेकर यांचे समवेत लोकसेवक श्री. रविंद्र जाधव यांचे कार्यालयात भेट घेण्यासाठी पाठविण्याचे निश्चित केले. त्यानंतर मी पुन्हा पंच श्री. कोळेकर यांचे समवेत लोकसेवक श्री. जाधव यांची भेट घेण्यासाठी त्यांचे कार्यालयामध्ये गेलो. सदर कार्यालयामध्ये गेल्यानंतर काही वेळ थांबल्यानंतर, काही वेळाने मी लोकसेवक जाधव यांना भेटण्याकरीता आत गेलो, मी लोकसेवक श्री.रविंद्र जाधव यांचे केबीनमध्ये जातेवेळी, पंचांना इशा-याने बाहेरच थांबण्यास सांगितले. कारण पंचांना सोबत घेवुन गेलो तर लोकसेवक श्री.रविंद्र जाधव हे माझेशी लाचेच्या मागणी संबंधाने बोलणी करणार नाही असे मला वाटल्याने मी पंच श्री. कोळेकर यांना बाहेर बसण्यास सांगुन, मी लोकसेवक श्री.रविंद्र जाधव, अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांची भेट घेण्याकरीता त्यांचे केबीनमध्ये गेलो. मी आत गेल्यानंतर, श्री. जाधव यांनी मला '' अडीच वर्षापासून मी तुमची वाट बघत आहे. तुमच कर्तव्य नाही का भेटायच ? काय पहायच ? आता तुम्ही. आणि तुमचं मेन ऑफीस माझेकडेच आहे. हे वरचे काही नाही'' असे बोलले, त्यावर मी त्यांना ठिक आहे सर.काय आहे. सांगा मं सर. असे बोललो असता, श्री. जाधव यांनी मला '' तुम्ही आतापर्यंत काही नाही केलत. तीन महिन्यात तुमच पाठवून दिलय मी आता. तुम्ही आता काय करा आता. त्यादिवशी एवढ टाकून द्या करुन असे बोलून लोकसेवक श्री. जाधव यांनी त्यांचे स्वहस्ताक्षरात एका को-या कागदावर इंग्रजीमध्ये 20 लिहीले आणि ''मग पुढील नेहमी एवढ करा''असे बोलून लोकसेवक श्री. जाधव यांनी स्वहस्ताक्षरात एका को-या कागदावर इंग्रजीमध्ये 10 लिहीले. त्यावेळी मी त्यांना '' किती ते'' असे विचारले त्यावर श्री. जाधव यांनी मला '' ट्वेंटी करा ना. हया वेळेला. असे बोलले. त्यावर मी त्यांना जास्त होतात असे सांगितले असता, लोकसेवक श्री. जाधव यांनी मला '' पंधरा कर काय होत नाय.'' असे सांगितले. त्यावर मी त्यांना ठीक आहे सर असे बोलून लोकसेवक श्री. जाधव यांचे केबीनमधून बाहेर पडून मी व पंच श्री. कोळेकर असे सरकारी वाहन थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तद्नंतर मी व पंच श्री. कोळेकर यांनी सर्व हकीगत पोनि श्रीमती ढगे पाटील यांना सांगितली.

लोकसेवक श्री. जाधव यांनी माझेकडे मी काम करीत असलेल्या मनाली इंटरप्रायजेसचे मीटर रिडींग, बिल प्रिंटींगची थकीत बिल पुढे पाठविण्याकरीता माझेकडे लाचेच्या रक्कम रू. 15,000/- ची मागणी करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने, पो.नि. ढगे-पाटील यांनी मला लोकसेवक श्री. रविंद्र जाधव, अतिरीक्त कार्यकारी अभियंता यांनी मागणी केल्याप्रमाणे लाचेची रक्कम देणसाठी 15,000/- रू. आणले आहेत काय? असे विचारले असता, मी त्यांना होय म्हणून सांगून लाचेच्या कारवाईकामी 15,000/-रु. पोनि ढगे पाटील यांच्याकडे हजर केले. मी हजर केलेल्या 500/-रु. दराच्या 30 नोटाचे नंबर्स नोदवून त्या सर्व नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावून, त्याचे प्रात्यक्षिक अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाषात करून दाखवून सविस्तर सापळापुर्व पंचनामा कारवाई करण्यात आली. व अॅन्थ्रासिन पावडर लावलेल्या नोटा माझे नेसूस शर्टच्या पुढील डाव्या बाजूच्या खिशात ठेवल्या. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने आवश्यक त्या सुचना देवून, लोकसेवक श्री. रविंद्र जाधव, अतिरीक्त कार्यकारी अभियंता यांचेविरूध्द नियोजित सापळा कारवाईकामी म. रा. वि. वि. कं. लि., वाशी उप विभाग, वाशी, नवी मुंबई येथे मी व पंच श्री. कोळेकर असे माझे टुव्हीलरने, पोहवा/पोटे भाडोत्री रिक्षाने व उर्वरीत सापळा पथक पायी जाण्याचा निर्णय पोनि ढगे पाटील यांनी घेतला व त्याप्रमाणे पंच क्र.2 व सापळा पथक म.रा.वि.वि.कं.लि., वाशी उप विभाग,वाशी



Scanned with OKEN Scanner

कार्यालयाचे दिशेने पायी गेले.

तद्नंतर पोहवा/पोटे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून, माझे शर्टचे आतील बनियानमध्ये लावल्यानंतर मी व पंच श्री. कोळेकर असे आम्ही माझे अॅक्टीव्हा टु व्हीलर मोटर सायकल क्रमांक एम.एच.43 ए एस 3925 या वाहनाने व पोहवा/पोटे हे भाडोत्री रिक्षाने, असे आम्ही हिमालय अपार्टमेंट, इमारत क्रमांक ई-2, शॉप नंबर 2, सेक्टर 4, वाशी, नवी मुंबई येथुन निघुन, लोकसेवक श्री.रविंद्र जाधव, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, यांची भेट घेण्याकरीता एम.एस.ई.डी.सी.एल. वाशी उपविभाग कार्यालय नवी मुंबई कार्यालयाचे दिशेने निघुन गेलो. काही वेळातच आम्ही म.रा.वि.वि.कं.लि., वाशी उप विभाग,वाशी कार्यालय येथे पोहचलो. त्यावेळी पो.नि.ढगे-पाटील, पोहवा/कोळी, पोहवा/तारी व पंच नंबर 2 श्री. सावंत असे एम.एस.ई.डी.सी.एल. वाशी उपविभाग कार्यालयाचे आवारात व पोहवा/पोटे व पोना/लोटेकर असे एम.एस.ई.डी.सी.एल. वाशी उपविभाग कार्यालयाचे पहिल्या मजल्यावर सापळा लावुन थांबुन असल्याचे दिसुन आले. त्यानंतर मी व पंच श्री.कोळेकर असे आम्ही दोघेही लोकसेवक श्री. जाधव यांची भेट घेण्याकरीता त्यांचे पहिल्या मजल्यावरील कार्यालयामध्ये गेलो. त्यावेळी लोकसेवक श्री. जाधव यांचे केबीनमध्ये अन्य व्यक्ती असल्याने, मी व पंच श्री. कोळेकर केबीनच्या बाहेर थांबून राहिलो. तद्नंतर काही वेळाने, लोकसेवक श्री. जाधव यांचे केबीनमधील व्यक्ती बाहेर आल्याने, मी लोकसेवक श्री. जाधव यांचे केबीनमध्ये गेलो व पंच श्री. कोळेकर केबीनच्या बाहेर थांबून राहिले. मी केबीनचे आत गेल्यानंतर सदर केबीनमध्ये लोकसेवक श्री. जाधव त्यांचे खुर्चीवर बसले होते. त्यावेळी त्यांनी मला त्यांचे उजव्या हाताचे इशा-याने लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा करून, " हा दया, जा... तुम्ही...ह्या बाजुने या...' असे सांगितले. त्यावेळी मी त्यांचे टेबलचे डाव्या बाजूस आलो व लोकसेवक श्री. जाधव यांनी त्यांचे डावे बाजूस असलेले कार्यालयीन टेबलवरील एक चॉकलेटी रंगाची डायरी उघडून माझेसमोर टेबलवर ठेवून, इशा-याने लाचेची रक्कम त्यात ठेवण्यास सांगितले. त्यावर मी माझे शर्टचे पुढील डावे खिशात ठेवलेली 15,000/- रू. लाचेची रक्कम माझे उजवे हाताने बाहेर काढुन ती लोकसेवक श्री. जाधव यांनी इशा-याने सांगितल्याप्रमाणे डायरीमध्ये ठेवली व " सांगितल्याप्रमाणे 15 हजार आहेत, बिलाचं बघा" असे बोललो. त्यानंतर लोकसेवक श्री. जाधव यांनी सदरची डायरी बंद करून, ती पुन्हा त्यांचे डावे बाजूकडील टेबलवर ठेवली व मला " जावा तुम्ही" असे सांगितले. त्यानंतर मी केबीनच्या बाहेर येवून, माझे डोळ्यावरील चष्मा माझे डावे हाताने काढून तो सापळा पथकास दिसेल अशा रीतीने डावे हातामध्ये ठेवून पुर्वनियोजित इशारा केला. त्यानंतर लागलीच पोना लोटेकर, पोना पोटे व त्यांचे पाठोपाठ पंच नंबर 1 श्री. कोळेकर, पोनि श्रीमती ढगे पाटील, पंच नं 2 श्री. सावंत व उर्वरीत सापळा पथक असे लोकसेवक श्री. जाधव यांचे केबीनमध्ये आले. त्यानंतर पो.नि.ढगे-पाटील यांनी लोकसेवक श्री. जाधव यांना स्वतःची तसेच पंच श्री. कोळेकर यांची ओळख सांगितल्यानंतर, तक्रारदार श्री. शिंदे यांचेकडुन स्विकारलेली लाचेची रक्कम कोठे ठेवली आहे ? याबाबत श्री. जाधव यांना विचारणा केली असता, लोकसेवक श्री. जाधव यांनी काहीही सांगण्यास नकार दिला. त्यानंतर मला सदर केबीनमध्ये बोलविलेनंतर मी सदर लाचेची रक्कम श्री. जाधव यांनी त्यांचे डावे बाजूकडील कार्यालयीन टेबलवरील डायरीमध्ये ठेवल्याचे सांगितले. त्यानंतर पो.नि.ढगे-पाटील यांचे सुचनेवरून पंच श्री.सावंत यांनी लोकसेवक श्री. जाधव यांचे डावे बाजूकडील कार्यालयीन टेबलवरील डायरीमध्ये ठेवलेली लाचेची रक्कम काढुन त्या चलनी नोटा त्यांचे दोन्ही हाताने मोजुन पाहिल्या असत्या त्यात 500/-रुपये दराच्या 30 चलनी नोटा असे एकुण 15,000/-(पंधरा हजार रूपये) आढळुन आले. त्यानंतर पो.नि.ढगे-पाटील यांनी लाचेची रक्कम स्विकारणा-या लोकसेवक श्री. जाधव, अतिरीक्त कार्यकारी अभियंता यांना पुढील कारवाईकामी 17:50 वाजता ताब्यात घेतले.

तद्नंतर हस्तगत केलेल्या नोटांचे क्रमांक पडताळले असता, ते सापळा पुर्व कारवाई दरम्यान एका कागदावर नोंदविलेल्या क्रमांकाशी मिळून आले.

तरी मी दिनांक 16/01/2023 रोजी लोकसेवक श्री. रविंद्र केशवराव जाधव, अतिरीक्त कार्यकारी अभियंता (वर्ग 1), महाराश्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि., वाशी उपविभाग, वाशी, नवी मुंबई यांचेविरूध्द लाचेची मागणी करत असलेबाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, दिनांक 17/01/2023 रोजी महाराश्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि., वाशी उपविभाग, वाषी, नवी मुंबई येथे करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईत, मी काम करीत असलेल्या मनाली इंटरप्रायजेस, वाशी यांचे एकुण 7,21,905.71/- रूपयाचे बिल समाधानकारक असा शेरा मारून मंजुरीकरीता पुढे पाठविण्याकरीता माझेकडे लोकसेवक श्री.रविंद्र जाधव यांनी 20,000/- रूपयांची लाचेची मागणी करून, तडजोडीअंती 15,000/- रूपये स्विकारण्याचे निष्पन्न झाल्याने, दिनांक 17/01/2023 रोजी आजमाविण्यात आलेल्या सापळा पंचनामा कारवाईत, लोकसेवक श्री. रविंद्र जाधव, अतिरीक्त कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.,वाशी उपविभाग, वाशी, नवी मुंबई यांनी माझेकडून 15,000/-रु. लाचेची रक्कम स्विकारली असताना, महाराश्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., वाशी उपविभाग, वाशी, नवी मुंबई येथे 17:50



Scanned with OKEN Scanner

वाजता रंगेहाथ पकडण्यात आले. तरी माझी त्यांच्याविरूध्द कायदेशीर फिर्याद असून, त्यांचेविरूध्द कारवाई होणेस विनंती आहे.

माझी फिर्याद मराठीतून संगणकावर टंकलीखीत करण्यात आली असुन, ती मी वाचून पाहिली, ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): pramod bhaskarrao toradmal
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.): pbmh173721
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

दशरथ तायडे
सहायक पोलीस निरीक्षक
वाशी पोलीस ठाणे,
नवी मुंबई.



Scanned with OKEN Scanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

Name (नाव): ramesh ramchandra

Rank(पद): (Inspector)

No.(सं.): mh49254

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ चा जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें.मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेहरा का प्रकार: सर्वसाधारण<br>माथा: साधारण कपाळ<br>गाल: साधारण गाल<br>ठोड़ी: साधारण हनुवटी<br>चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**

**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**



Scanned with OKEN Scanner